# पंडीत नेहरुंचे लोकशाही संबंधी विचार

**डॉ. सय्यद कुरेशाबी नजीरसाब**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
आझाद महाविद्यालय, औसा
Email. kureshabi@gmail.com
mo.no. 9975478111

## सारांश

पं. नेहरुनी लोकशाहीची चौकट कोठेही खिळखिळी होवू न देता भारताला प्रगतीपधावर नेण्याचा आणि भारताची सर्वांगिण प्रगती साधण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न पंतप्रधान नेहरुंनी केला. भारतीय राज्य घटनेचे पावित्र्य त्यांनी अबाधित ठेवले लोकशाहीच्या वास्तुला कोठेही तडा जावू न देण्याची खबरदारीही त्यांनी सातत्याने घेतली. कारण त्यांना लोकशाही वर विश्वास दृड होता. ते लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. नेहरुंना लोकशाही केवळ राजकीय जिवनातील नको होती तर त्यांना समाजिक व आर्थी लोकशाही हवी होती. लोकशाहीकडे पाहण्याचा नेहरुंचा दृष्टीकोण खुप व्यापाक होता. लोकशाही म्हणजे केवळ हुकुमशाही किंवा अधिकारशाही यांच्या विरुध्द असलेली एक प्रतिक्रिया या संकुचित अर्थाने ते लोकशाहीला समजत नव्हेते तर ती एक जिवनपध्दती, विचार पध्दती आणि एक वैशिष्टपुर्ण राजकीय क्षेत्रात संधीचा समता याचेच चित्र पाहता असत नेहरुंच्या लोकशाही विचारांमध्ये व्यक्ती व त्यांच स्वातंत्र्य हा त्यांच्या वैचारिक केंद्रबिंदू होता.

**पारिभाषिक शब्द :** लोकशाही संबंधी विचार, लोकशाहीची आवश्यकता, लोकशाहीचे स्वरूप

**प्रस्तावना :**

पं. नेहरू हे लाकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. इंग्लडमध्ये असताना जे. एस. मील, ग्लॅडस्टंट या विचारवंतांच्या उदारमतवादी विचारसरणीने ते प्रभावित झाले व त्यांनी लोकशाहीचा स्वीकार केला. नेहरुंचा मानवता व त्यावरील विश्वास दृढ असल्यामुळे त्यांनी लोकशाही शासण प्रणालीचे समर्थ केले. नेहरुंना संसदीय लनोकशाही अपेक्षीत होती. कारण ब्रिटीशांच्या एकछत्री राज्यकारभारामुळे भारतातील सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण झाले. आर्थीक विषमता निर्माण झाली त्यातुनच सामाजिक उच्च निच्च भावना निर्माण होऊन लोकांमधीन अन्याय व अत्याचार वाढले. या दयनिय परिस्थीतीवर मात करण्यासाठी लोकाशाही शासन पध्दतीचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे मत पं. नेहरुंनी व्यक्त केले.

**1) पं. नेहरुंचे लोकशाही संबंधी विचार :**

पं. नेहरुंनी लोकशाहीची व्याख्या अत्यंत समावेशक आहे. लोकशाही म्हणजे कांही राजकीय संस्थाची उपस्थिती एवढाच मर्यादित अर्थ होत नाहीत. तर व्यक्तीच्या विकासासाठी पुरेपूर संधी उपलब्ध्द करून देणारा चैतण्यमय समाज असता त्यांचा लोकशाहीचा अर्थ आहे. ते म्हणतात लोकशाही केवळ राजकीय नसते. केवळ आर्थीक ही नसते ती एक मनोअवस्था असते. सर्वांना राजकीय व आर्थीक क्षेत्रात समान संधी मिळणे त्यात अभिप्रेत असते. व्यक्तीला विकासारचे स्वातंत्र्य असून आपल्या क्षमतेचा व पात्रतेचा पुरेपुर फायद्या घेण्याचे स्वातंत्र त्यात असते. दुसऱ्या बद्दल व आपल्याशी न जुळणाऱ्या त्यांच्या मताबद्दल सहिष्णुता असते. ती एक प्रवाही गोष्ट आहे. शेवटी आपल्या राजकीय समस्थाकडे पाहण्याच्या लोकशाही हा एक माणसिक दृष्टीकोण असतो.

**2) लोकशाहीची आवश्यकता :**

पं. नेहरू यांनी लोकशाहीची आवश्यकता हि पुढील कारणामुळे आवश्यक वाटत होती.

अ) समाजिक आणि राजकीय बदल घडवून आणण्यासाठी नेहरुंना लोकशाहीची आवश्यकता वाटत होती. नेहरुंना लोकशाही ही केवळ राजकीय जिवनातील लोकशाही या मर्यादित अर्थाने नको होती तर त्यांना राजकीय लोकशाही बरोबर समाजिक व आर्थीक लोकशाही हवी होती.

ब) नेहरुंच्या मते राजकीय लोकशाही टिकविण्यासाठी आर्थीक लोकशाही साथ आवश्यक आहे. त्यांनी समाजवाद प्रस्थापित

करण्यासाठी त्यांच्या लोकशाहीवर विश्वास होता.

क) संधीची समानता : शोषणमुक्त समाज निर्माध करण्यासाठी संधीची समानता आवृयक असते व लोकशाहीद्वारे संधीची समानता निर्माण करता येवू शकते.

ड) आर्थिक न्याय : लोकशाहीच्या माध्यमातून आर्थीक न्याय प्रस्थापित केला जावून शकतो असा विश्वास नेहरुंना होता म्हणून त्यांना लोकशाही इतर व्यवस्थांपेक्षा योग्य आहे असे वाटत होते.

**3) लोकशाहीचे स्वरूप :**

i) व्यक्तीस्वातंत्र : लोकशाहीत व्यक्ती ही केंद्रस्थानी असेल व्यक्तीचा विकास म्हणजे कुटुंबाचा, समाजाचा व देशाचा विकास होय. व्यक्ती स्वातंत्राला नेहरुंनी लोकशाहीचा आत्मा असे म्हटले आहे.

ii) विचार विनिमय व शिस्तीला महत्व :

लोकशाहीत इतरांच्या मताला महत्व देणे लोकशाहीत इतरांची मते जाणुन घेतली पाहिजेत, लोकशाही हे लाकांचे सरकार असल्यामुळे त्यात विचार विनियमयाप्रमाणेच शिस्तीचे भान असावे.

iii) मुलभूत हक्कांना प्राधाण्या देण्यात यावे.

iv) लोकशाही व समता नेहरुंच्यामते लोकशाहीचा मुख्य आधार समाजिक आणि आर्थीक समानता आहे.

v) संसदीय लोकशाहीचा स्वीकार संसदीय लोकशाहीत संसदेचे सर्व श्रेष्ठत्व व सार्वभौमत्व मान्य असते. त्यामुळे परिस्थीतीनुसार नियमात बदल करणे शक्य असते.

vi) लोकशाही व समाजवादाचा समन्वय : नेहरुंनी लोकशाही व समाजवाद यांचे एकत्रीकरण करून मोठे उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीचे केले तर लहान उद्योगधंदे खाजगी मालकीचे ठेवले.

**सारांश :**

अशा प्रकारे व्यक्ती विकास व राष्ट्र विकासाचे उद्दीष्टे डोळयासमोर ठेवून पं. नेहरुंनी लोकशाही विचारसाणीचा स्विकार केला. पं. नेहरुंनी केवळ लोकशाहीचे विचारच मांडले नसुन तर ते स्वत: आचरणात देखील आणण्याचा प्रयत्न केला. संसदेला व विरोधकांना त्यांनी कधीच तुच्छ मानले नाही स्वत: प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष हुकुमशहा होण्याचा खटाटोप त्यांनी केला नाही. व आज 75 वर्षे या देशात लोकशाही रूजविण्याचे श्रेय नेहरुनांच द्यावे लागेल म्हणूनच बट्रान्ड रसेल नेहरुबद्दल बोलताना एकदा म्हणाले होते. "मी नेहरुंना एक थोर नेता मानतो, कारण हुकुमशाह बनण्याकरता लागणारी मार्ग स्विकारला भारताची प्रगती लोकशाहीद्वोर साधण्यातच भारताचे कल्याण आहे. हे मसजण्याकरता लागणारे शहाणपण आणि ऐतिहासीक दृष्टी नेहरुंजवळ आहे म्हणून मी त्यांना एक द... पुरूष माणतो.

**संदर्भ :**


1) भा.ल. भोळे - आधुनिक भारतातील राजकिय विचार

2) डॉ.प्रभा कस्तुरे वाडकर - पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत अरुणा प्रकाशन, लातूर.

3) प्रा. डॉ. शुभांगी राठी - भारतीय राजकीय विचारवंत कैलाश पब्लीकेशन, औरंगाबाद

4) लोकसत्ता - पं. नेहरु : दृष्टये लोकशाहिवादी 7 जुन 2020.

5) महाराष्ट्र टाईम्स - पं. जवाहरलाल नेहरु : आधुनिक भारताचे शिल्पकार, 14 नोव्हेंबर 2020